आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२५ जून २०२४ - मंगळवार

<u>ठळक बातम्या</u>

- लोकसभेच्या सभापतीपदासाठी उद्या निवडणूक / राष्ट्रीय लोकशाही आघाडीतर्फे ओम बिर्ला तर विरोधकांकडून काँग्रेसचे के. सुरेश रिंगणात
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी उद्या मतदान
- पुणे पोर्शे अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश
- टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारत, इंग्लंड, आणि दक्षिण आफ्रिकेबरोबर अफगाणिस्तानही उपांत्य फेरीत दाखल

आणि

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७१२ अंकांची वाढ नोंदवत ७८ हजाराच्या वर बंद

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं लोकसभा सभापतीपदासाठी ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. आज त्यांनी सभापतीपदासाठी अर्ज भरला. गेल्या लोकसभेतही ते सभापती होते. विरोधकांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या पदासाठी उद्या निवडणूक होणार आहे. लोकसभेच्या सभापतींची निवड एकमतानं आणि बिनविरोध व्हायला हवी असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यापासून आतापर्यंत कधीही या पदाची निवडणूक झालेली नाही. सरकारनं विरोधकांशी चर्चा करुन सहमतीचा प्रयत्न केला. पण विरोधकांनी काही अटी ठेवल्या. सहमती ही अटींशिवाय व्हायला हवी, अशी मागणी रिजीजू यांनी मांडली.

सभापतीपदाच्या उमेदवारावर सहमती व्हावी यासाठी सरकारनं विरोधकांशी चर्चा केली होती. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंग आणि पीयूष गोयल यांनी

काँग्रेस नेते के सी. वेणुगोपाल आणि द्रमुक नेता टी. आर. बालू यांच्याशी चर्चा केली. राजनाथ सिंग यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनाही फोन करुन सत्ताधारीपक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. पण विरोधकांनी उप सभापतीपदाच्या उमेदवाराचं नाव जाहीर करण्याची मागणी केली. पण उप सभापतीपदावरच्या उमेदवाराचं नाव योग्य वेळी जाहीर करू असं सत्ताधारी पक्षानं सांगितलं. त्यामुळं सभापतीची निवड एकमतानं करण्यावर सहमती झाली नाही.

<><><><><>

१८ व्या लोकसभा अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी अनेक खासदारांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, भाजपाचे नारायण राणे यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली.

पंजाबचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेस नेते चरणजीत चन्नी, शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर यांच्यासह भाजपा खासदार संबित पात्रा, बैजयंत पांडा यांनीही शपथ घेतली.

राजस्थानमधले भाजपा खासदार ओम बिर्ला, दुष्यंत सिंह, माकप खासदार अमराराम, आरएलपी खासदार हनुमान बेनीवाल यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. द्रमुकचे कनिमोळी, दयानिधी मारन, टी आर बालू तसंच एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही शपथ घेतली. विविध पक्षांच्या खासदारांनी आज मराठी, हिंदी, तमिळ, उर्दू, उडिया, पंजाबी अशा विविध भाषांमध्ये शपथ घेतली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना २७ जून रोजी संबोधित करणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांसाठी उद्या मतदान होणार आहे. सकाळी ७ वाजेपासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत हे मतदान होईल. या मतांची मोजणी १ जुलै रोजी होणार आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात ८, कोकण पदवीधरमध्ये १३, नाशिक शिक्षकमध्ये २१ तर मुंबई शिक्षक मतदारसंघात १३ उमेदवार रिंगणात आहेत.

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी २ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील ३ जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ५ जुलैपर्यंत आहे. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या परिस्थितीविषयी आणि विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीतल्या काँग्रेस मुख्यालयात आज बैठक झाली. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल, मुकुल वासनिक यांच्यासह राज्यातले नेते या बैठकीला उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या राज्यातल्या कामगिरीविषयी खर्गे यांनी सर्वांचं अभिनंदन केलं आणि मतदारांचे आभार मानले.

<><><><><>

स्वच्छ इंधन निर्मितीच्या क्षमतेमुळे ऊसाचा भाव नव्या उंचीवर पोहोचला आहे, असं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रह्लाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारताच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या ६४ व्या आंतरराष्ट्रीय साखर संघटनेच्या बैठकीत बोलत होते. ऊसापासून साखर तर त्याच्या कचऱ्यापासून इथेनॉल मिळत असल्यामुळे कमीत कमी पाण्याचा वापर

करून ऊसाचं उत्पादन वाढवण्याबाबत संशोधन करण्याचं आवाहन जोशी यांनी उपस्थित तज्ञांना केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १९७५ मध्ये देशात लागू करण्यात आलेल्या राजकीय आणीबाणीचा विरोध करणाऱ्या सर्व स्त्री - पुरुषांना आदरांजली वाहिली आहे. सर्व भारतीयांना सन्मानिय असणाऱ्या संविधानाला अपमानित करत काँग्रेसनं जनतेच्या मुलभूत स्वातंत्र्याचं हनन केलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असल्याचं, प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

आगामी सर्वसाधारण अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी सातवी अर्थसंकल्प पूर्व बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विविध व्यापार आणि सेवा पुरवठादार प्रतिनिधींसोबत सीतारामन यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीला केंद्रीय अर्थराज्य मंत्री पंकज चौधरीही उपस्थित होते.

रोजगार आणि कौशल्य विकास तज्ञांसोबतही त्यांनी आज आणखी एक बैठक घेतली.

<><><><><>

पुणे पोर्श कार अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. आरोपीची बालसुधारगृहात रवानगी करण्याचे आदेश बाल न्याय मंडळानं दिले होते. या आदेशाला आव्हान देत आरोपीच्या आत्यानं उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली होती. या आरोपीची तत्काळ सुटका करण्याचे

आणि आत्याच्या ताब्यात देण्याचे निर्देश न्यायालयानं दिले. मात्र, आरोपीचं समुपदेशन सुरू राहील, असंही न्यायालयानं यावेळी म्हटलं.

या प्रकरणात बळी गेलेल्यांच्या कुटुंबांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर झाला असला तरी या प्रकरणातल्या दोषींवर कारवाई करणारच असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

नीट परीक्षा घोटाळ्यातल्या आणखी एका आरोपीला लातूर पोलिसांनी अटक केली आहे. संजय जाधव असं या आरोपीचं नाव आहे. त्याला न्यायालयापुढं आज हजर केलं असता न्यायालयानं त्याला २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी दिली.

<><><><><>

टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ पोहोचले आहे. आज झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस पद्धतीनुसार अफगाणिस्ताननं बांग्लादेशला ८ धावांनी पराभूत केलं. त्यामुळं अफगाणिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला आणि उपांत्य फेरीत जाण्याचं ऑस्ट्रेलियाचं स्वप्न भंगलं.

उपांत्य फेरीतला दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातला सामना गुरुवारी सकाळी ६ वाजता, तर भारत आणि इंग्लंड यांच्यातला सामना त्याच दिवशी रात्री ८ वाजता होईल.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज पहिल्यांदा ७८ हजारांचा टप्पा ओलांडला. दिवसअखेर सेन्सेक्स ७१२ अंकांची वाढ नोंदवत, ७८ हजार ५४ अंकांच्या विक्रमी पातळीवर बंद झाला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सनं ७८ हजार १६५ अंकांच्या उच्चांकाला स्पर्श केला होता.

निफ्टीनंही आज पहिल्यांदाच २३ हजार ७०० अंकांची पातळी ओलांडली. दिवसअखेर निफ्टी १८३ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ७२१ अंकांवर बंद झाला. निफ्टी बँकही पहिल्यांदाच ५२ हजारांच्या पलीकडे जाऊन स्थिरावला.

बँकिंग, माहिती तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रातल्या समभागांमुळं बाजारात आज तेजी राहिली.

<><><><><>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातल्या खरीप पिकांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसान भरपाईसाठीच्या मदतीचं वाटप ३० जूनपर्यंत पूर्ण करावं, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले. सरकारनं शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करावी, शेतीच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर करावा, कृषी विद्यापीठांनी नवीन संशोधनावर भर द्यावा, ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे अशा भागात विशेष लक्ष केंद्रित करावं अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

<><><><><>

पश्चिम बंगालच्या, हिमालयाकडच्या भागांत, आणि सिक्कीममध्ये आज अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पुढच्या चार ते पाच दिवसांत पश्चिम किनारपट्टी आणि ईशान्य भारतात मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज आहे. येत्या तीन ते चार दिवसांत उत्तर, पश्चिम, मध्य, पूर्व आणि वायव्य भारतातल्या काही भागांमध्ये नैऋत्य मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती राहील, तर राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात पुढचे पाच ते सहा दिवस हलका पाऊस आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या पश्चिम भागात उष्णतेची लाट राहील.